# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**खाते / विभाग - सार्वजनिक आरोग्य खाते ( माध्यमिक आरोग्य सेवा ) - आर/उत्तर विभाग**

**उपविभाग - श्री हरिलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय,**
**एस.व्ही.पी. रोड, बोरीवली ( पश्चिम ), मुंबई - 400 103.**

## <u>अध्याय १</u>

## <u>प्रस्तावना</u>

पार्श्वभूमी

माहितीचा अधिकार अधिनियम २००५, हा राष्ट्रपतींच्या प्रधिकारांचे दि.१५.जून २००५ पासून प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाच्या कामकाजामध्ये अधिकाधिक पारदर्शकता आणि उतरदायित्व निर्माण करण्याच्या दृ्ष्टीने सार्वजनिक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील माहिती नागरिकांना मिळविता यावी म्हणून नागरिकांची माहिती मिळण्याचा अधिकाराची व्यवहार्य शासन पध्दत आखून देण्याकरिता , केंद्रिय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग घटित करण्याकरिता आणि तत्सबंधित किंवा तदनुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी अधिनियम.

श्री. हरीलाल भगवती महानगरपालिका सर्वसाधारण रूग्णालय, बोरीवली (प) येथील रूग्णालयाची इमारत धोकादायक ठरल्यामुळे सर्व कक्ष व कर्मचा-यांसह भगवती रुग्णालयाचे स्थानांतरण कांदिवली येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर रूग्णालय येथे दि .04 ऑक्टोबर रोजी 2013झाले आहे.

स्थानिक जनतेला वैदयकीय सुविधा तातडीने उपलब्ध व्हाव्यात या हेतूने भगवती रुग्णालयाच्या पुर्नविकासाच्या पहिल्या टप्प्यात रुग्णशय्येच्या वैद्यकीय विभागाची इमारत 110 बांधून तयार असून दि. 15.04.2016 रोजी बाहयरुग्ण विभाग व त्याला संलग्न इतर विभाग सुरु करण्यात आले आहेत. तसेच दि 27.06.2016 रोजी आंतररूग्ण विभागाचे 2 कक्ष सुरू करण्यात आले.